**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

---

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - १३/०७/२०२६**

## बृहन्मुंबई आयुक्तालया अंतर्गत १०० हुन अधिक महानगरपालीका शाळांमध्ये एकाचवेळी Drugs Free Mumbai अभियान यशस्वीरित्या राबविलेबाबत.

अंमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराला प्रतिबंध घालण्यासाठी तसेच विद्यार्थांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा यांचेवतीने दि. १३ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ते १२.०० वा.दरम्यान **"Drugs Free Mumbai"** अभियानांतर्गत दादर येथील ‘‘सीव्हीसी सेंटर’’ मधुन मुंबईतील १०० हून अधिक महानगरपालिका शाळांमधील ४,००० हुन अधिक विद्यार्थांनी एकाचवेळी जनजागृती कार्यक्रमांचे सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे युटुब लिंकद्वारे देखील मोठया प्रमाणामध्ये शाळेतील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग घेतला आहे.

या उपक्रमामध्ये पोलीस उप आयुक्त, पौर्णिमा चौगुले-श्रींगी, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक व कायदेशीर दुष्परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थांना व्यसनमुक्त, निरोगी व जबाबदार जीवनशैलीचा स्वीकार करण्याचे आवाहन करण्यात आले.

सदर कार्यक्रमात विशेष मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशक म्हणुन मानसोपचारतज्ञ, सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील अभ्यासक आणि समुदायाधारित मानसिक आरोग्य सेवा क्षेत्रात कार्यरत असलेले तज्ञ डॉ. निलेश वसंत मोहिते यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे माइंडसेट वेलनेस अँड हीलिंग येथे रिकव्हरी इंटिग्रेशन स्पेशालिस्ट म्हणून कार्यरत असलेले श्री. अक्षय कुमार एस.शेट हे देखील सदर ठिकाणी उपस्थित होते. त्यांनी कार्यक्रमादरम्यान विद्यार्थांनी अंमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर राहण्याचा, आपल्या मित्र-मैत्रिणींना व्यसनापासून परावृत्त करण्याचा तसेच अंमली पदार्थमुक्त समाज घडविण्यासाठी सक्रिय भूमिका बजावण्याचा संदेश देण्यात आला.

या अभियानाला महानगरपालिका शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १०० हून अधिक शाळांमध्ये एकाचवेळी जनजागृती कार्यक्रम राबविण्याचा हा उपक्रम **"Drugs Free Mumbai"** अभियानातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला असून, अंमली पदार्थमुक्त, सुरक्षित आणि सशक्त मुंबई घडविण्याच्या दिशेने बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची प्रचिती देणारा आहे. बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय सर्व नागरिक, पालक, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांना **"Drugs Free Mumbai"** अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून अंमली पदार्थमुक्त मुंबईच्या निर्मितीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन करीत आहे.

**अशाप्रकारे बृहन्मुंबई पोलीस दल हे अंमली पदार्थ मुक्त समाज निर्मितीसाठी सतत प्रयत्नशिल असून, ड्रग्जचा पुरवठादारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ड्रग्ज तस्करांवर सतत कारवाई करत आहे. त्याचबरोबर ड्रग्जची मागणी कमी होणे आवश्यक असल्याने, आजची तरूण पिढी, शाळा/महाविद्यालयातील विद्यार्थी, मुंबईकरांना विविध माध्यमांद्वारे ड्रग्जच्या सेवनांचे परिणांमाबाबत माहिती देते. तसेच ड्रग्जचे सेवन न करणेबाबत आवाहन करून ‘‘ड्रग्ज फ्री मुंबई’’ करणेबाबत मुंबईकरांनी पोलीसांना ड्रग्ज खरेदी/विक्री/तस्करी/सेवनाबाबत पोलीसांना त्वरित माहिती देवून मदत करणेबाबत आवाहन केले जाते.**

**सदर जनजागृती कार्यक्रम हे मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री. अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मा.श्री कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांनी राबविले आहे.**

------------ooo-----------